|| श्री ||
आपली भूमी.. आपला आवाज...
# वीरभूमी
संपादक : महादेव दळे
www.veerbhuminews.com

**✻ सुविचार ✻**
आयुष्य हे एक सुंदर प्रवास आहे; प्रत्येक दिवसाला एक नवीन अध्याय मानून जगा.




■ अहमदनगर ■ गुरुवार, दि. १६ मे २०२४ | ■ वर्ष ५ वे ■ अंक ७२ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये | ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 | 9420802145



**महिला शेतकऱ्याच्या गाई चोरणाऱ्याला अटक**
पान क्र. २ वर



**वीज पडून गाय, बैल व तीन मेंढ्या दगावल्या**
पान क्र. ३ वर



**जनावरांना व माणसांना टँकरने पाणी द्या**
पान क्र. ४ वर

# नकली शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये विलीन होणारच!

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा उद्धव ठाकरे, शरद पवार यांच्याव हल्लाबोल

**● पुणे । वीरभूमी –**
महाराष्ट्रातील नकली शिवसेना व नकली राष्ट्रवादी निवडणुकीनंतर काँग्रेसमध्ये विलीन होतील, असा दावा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला आहे. यावेळी त्यांनी शरद पवार व उद्धव ठाकरे यांच्यावरही जोरदार हल्लाबोल केला. महाराष्ट्रात निवडणुकीचा पाचवा टप्पा उरला आहे. आज पंतप्रधान नरेंद्र मोदींची सभा नाशिकमध्ये झाली. यावेळी मोदींनी पुन्हा एकदा उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेला नकली शिवसेना व शरद पवारांच्या राष्ट्रवादीला नकली राष्ट्रवादी म्हटलं आहे. निवडणुकीतनंतर हे दोन पक्ष काँग्रेसमध्ये विलीन होतील असा दावा त्यांनी केला.

मोदी म्हणाले की, उद्धव ठाकरेंची नकली शिवसेना आणि शरद पवारांची नकली राष्ट्रवादी काँग्रेस या दोन्ही पक्षांचं काँग्रेसमध्ये विलीनीकरण होणार हे नक्की आहे. नकली शिवसेना काँग्रेसमध्ये विलीन होईल तेव्हा मला सर्वात जास्त आठवण येईल ती बाळासाहेब ठाकरेंची.



बाळासाहेब ठाकरे म्हणायचे ज्यादिवशी शिवसेनेची काँग्रेस होताना दिसेल तेव्हा मी माझं दुकान बंद करेन. आता नकली शिवसेनेचं अस्तित्त्व संपणार आहे. नकली शिवसेनेने बाळासाहेब ठाकरेंची स्वप्नं धुळीला मिळवली. बाळासाहेबांना वाटायचं अयोध्येत भव्य राम मंदिर उभारलं जावं, कलम ३७० मागे घेतलं जावं. बाळासाहेबांचं स्वप्न पूर्ण झालं मात्र आत्ताच्या नकली शिवसेनेला या सगळ्याचा राग येतो आहे.

काँग्रेसची अवस्था अशी आहे की, त्यांना विरोधी पक्षातही बसता येणार नाही. त्यामुळेच महाराष्ट्रातले एक नेते आहेत, त्यांनी असा दावा केला आहे की निवडणूक संपल्यावर काँग्रेस पक्षात लहान पक्ष विलीन होतील. तसा सल्लाच या बड्या नेत्याने दिला आहे. कारण त्यांना वाटतं की सगळी दुकानं सुरु आहेत ती एकत्र आली तर काँग्रेस विरोधी पक्षात बसू शकतो. ही यांची अवस्था आहे, असं मोदींनी म्हटलं आहे.

काँग्रेसने अयोध्येतील श्रीराम मंदिराच्या प्राणप्रतिष्ठापना सोहळ्यावर बहिष्कार घातला. नकली शिवसेनेही त्यांच्याच पावलावर पाऊल टाकलं. काँग्रेसचे लोक मंदिराबाबत काहीही बोलत आहेत आणि नकली शिवसेना एकदम गप्प आहे. दोन्ही पक्ष पापांचे भागीदार आहेत. महाराष्ट्राला नकली शिवसेना काय आहे ते कळलं आहे. हे नकली शिवसेनेचे लोक काँग्रेसला डोक्यावर घेऊन नाचत आहेत, जो काँग्रेस पक्ष दिवसरात्र फक्त वीर सावरकरांची निंदा करतो आहे, महाराष्ट्राची स्वाभिमानी आणि राष्ट्रभक्त जनता हे पाहते तेव्हा लोकांच्या मनातला राग खूप वाढतो. नकली शिवसेनेत अहंकार आला आहे. मात्र महाराष्ट्राला काय वाटतं आहे याचं काही देणंघेणं त्यांना नाही. नकली शिवसेनेने काँग्रेसपुढे गुडघे टेकले आहेत. या शिवसेनेला धडा शिकवण्याचा निर्णय महाराष्ट्राच्या जनतेने घेतला आहे. तसंच यांना चारी मुंड्या चीत केलं आहे. असं म्हणत मोदींनी उद्धव ठाकरेंवर जोरदार टीका केली.

## SPOT NEWS

### सचिनच्या बॉडीगार्डची डोक्यात गोळी झाडून आत्महत्या

**● जळगाव ।** क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर यांच्या बॉडीगार्डने बुधवारी मध्यरात्री दीड वाजण्याच्या सुमारास जामनेर येथील राहत्या घरी सर्व्हिस रिव्हॉल्व्हरने डोक्यात गोळी झाडून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या प्रकरणी जामनेर पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली. आत्महत्येचे कारण अस्पष्ट आहे. प्रकाश गोविंदा कापडे (३९) असे मृताचे नाव आहे. ते १५ वर्षांपासून राज्य राखीव पोलिस दल मुंबई येथे कार्यरत होते. एक वर्षापासून ते स्पेशल प्रोटेक्शन युनिटमध्ये प्रतिनियुक्तीवर सचिन तेंडुलकर यांच्याकडे अंगरक्षक म्हणून कार्यरत होते. चार दिवसांपूर्वी मतदानासाठी ते जामनेरला आले होते. त्यांच्या रिव्हॉल्व्हरमध्ये दहा गोळ्या होत्या. त्यातील दोन गोळ्या झाडल्याची माहिती पोलिसांनी दिली.

### 'सीएए'मुळे १४ जणांना भारतीय नागरिकत्व बहाल

**● नवी दिल्ली ।** केंद्रीय गृह मंत्रालयाने नागरिकत्व सुधारणा कायदा (सीएए) अंतर्गत बुधवारी १४ जणांना नागरिकत्व बहाल केले. नागरिकत्व सुधारणा कायद्याच्या पहिल्या संचाअंतर्गत, केंद्र सरकारने १४ लोकांना भारतीय नागरिकत्व प्रमाणपत्रे प्रदान केली आहेत. केंद्रीय गृह सचिव अजयकुमार भल्ला यांनी नवी दिल्लीत पहिल्या १४ लोकांना 'सीएए' अंतर्गत नागरिकत्व प्रमाणपत्रे सुपूर्द केली. नागरिकत्व सुधारणा कायदा (सीएए) अंतर्गत नागरिकत्व प्रमाणपत्रांचा पहिला संच बुधवारी जारी करण्यात आला. केंद्र सरकारकडून १४ जणांना नागरिकत्व प्रमाणपत्रे देण्यात आली आहेत. नागरिकत्व प्रमाणपत्र जारी केल्यानंतर, पाकिस्तान, अफगाणिस्तान आणि बांगला देशातून छळ झालेल्या गैर-मुस्लिम स्थलांतरितांना भारतीय नागरिकत्व देण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे.

# पाण्यासाठी केडगावकरांचा मनपा आयुक्तांच्या दालनात ठिय्या

**● नगर । वीरभूमी –**
केडगाव उपनगर परिसरातील आयोध्यानगरमध्ये गेल्या अनेक महिन्यांपासून पुरेशा दाबाने पाणीपुरवठा होत नसल्याने ७० ते ८० घरांना पाणीच मिळत नव्हते. पाणीपुरवठा विभागाकडे वारंवार तक्रारी करूनही कोणीही दाखल घेत नसल्याने अयोध्यानगर परिसरातील महिलांनी थेट महापालिकेवर मोर्चा आणून आयुक्त डॉ. पंकज जावळे यांच्या दालनात ठिय्या मांडला. येत्या आठ दिवसांत पाणीपुरवठा सुरळीत होईल, असे आश्वासन आयुक्तांनी दिले.

शहरात काही भागात पुरेशा दाबाने पाणीपुरवठा होत नसल्याच्या नागरिकांच्या तक्रारी आहेत. त्यात केडगाव उपनगरातील अयोध्यानगरमध्ये पाण्याची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत आहे. आधीच तीन चार दिवसातून एकदाच पाणी येते. त्यातही पुरेसे पाणी मिळत नाही. या भागात सहा महिन्यांपासून नागरिक पाण्याच्या समस्येमुळे त्रस्त आहेत. त्यामुळे माजी नगरसेवक विजय पठारे यांच्या नेतृत्वाखाली परिसरातील महिलांनी प्रशासक तथा आयुक्त डॉ. पंकज जावळे यांना धारेवर धरीत ठिय्या मांडला. अयोध्यानगरमध्ये जोपर्यंत पाणीपुरवठा सुरळीत होत नाही तोपर्यंत पिण्याच्या पाण्यासाठी टँकर सुरू करण्याची मागणी महिलांनी केली. दरम्यान, प्रशासक जावळे यांनी तातडीने उपाययोजना करण्याचे आदेश पाणीपुरवठा विभागाला दिले. तसेच येत्या आठ दिवसांत पाणीपुरवठा सुरळीत करण्याचे आश्वासन दिले. यावेळी मंगल म्हस्के, सचिन दीक्षित, राजू शिंदे, योगेश पाटोळे यांच्यासह महिला उपस्थित होत्या. महापालिकेने येत्या आठवड्यात हा प्रश्न न सोडवल्यास परिसरातील नागरिकांना घेऊन महापालिकेत तीव्र आंदोलन करण्याचा इशारा विजय पठारे यांनी दिला.

# नारायणगावात सट्टा खेळविणाऱ्या अनधिकृत कॉल सेंटरवर छापा; ९० जण ताब्यात

**● पुणे । वीरभूमी –**
महादेव बुक व लोटस ३६५ या ॲपद्वारे ऑनलाईन सट्टा खेळविणाऱ्या येथील अनधिकृत कॉल सेंटरवर स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा व खेड उपविभागीय पोलिस अधिकारी सुदर्शन पाटील यांच्या पथकाने बुधवारी (दि. १५) पहाटे छापा टाकला. कॉल सेंटरवर काम करणाऱ्या सुमारे ९० कर्मचाऱ्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले असून, कॉल सेंटर चालवणाऱ्या दोन संशयितांची नावे प्राथमिक तपासात निष्पन्न झाली आहेत, अशी माहिती पुणे ग्रामीणचे पोलिस अधीक्षक पंकज देशमुख यांनी पत्रकारांना दिली.

पोलिस अधीक्षक देशमुख म्हणाले की, नारायणगाव येथील प्रतिष्ठित व्यापारी ऋतिक सुरेश कोठारी व जुन्नर येथील राजेश बोकारिया यांची नावे कॉल सेंटर चालवणारे म्हणून प्राथमिक तपासात समोर आली आहेत. कारवाईनंतर ते फरारी झाले आहेत. पुणे-नाशिक महामार्गालगत नारायणगाव येथे मध्यवर्ती ठिकाणी चार मजली इमारत आहे. या इमारतीतील तीन मजले दोन महिन्यांपूर्वी नारायणगाव येथील ऋतिक कोठारी व जुन्नर येथील राजेश बोकारिया यांनी आयटी कंपनी सुरू करण्यासाठी भाडेतत्त्वावर घेतले होते. मात्र, संबंधित व्यक्तींनी या ठिकाणी महादेव बुक व लोटस ३६५ या ॲपद्वारे आयपीएलसह विविध खेळांवर सट्टा खेळणाऱ्या ग्राहकांचे पैसे देण्यासाठी अनधिकृत कॉल सेंटर सुरू केले होते. या कॉल सेंटरद्वारे सट्टा खेळणाऱ्या ग्राहकांचे पैसे (प्रोसेसिंग युनिट) एका अकाऊंटवर जमा केले जात असत व दुसऱ्या अकाऊंटवरून सट्टा लावलेल्या विजेत्या ग्राहकांना दिले जात असत. या कॉल सेंटरवर राज्य, परराज्य तसेच स्थानिक ९० पेक्षा जास्त तरुणांना कामाला ठेवण्यात आले होते.

# पाण्यासाठी कोहंडी ग्रामपंचायतीला ठोकले टाळे

## माजी जि. प. सदस्य सुनिताताई भांगरे यांनी भेट देत गटविकास अधिकाऱ्यांशी केली चर्चा

**● अकोले । वीरभूमी –**
पिण्याच्या पाण्याच्या मागणीसाठी कोहंडी येथे लहान मुलांसह संतप्त महिलांनी ग्रामपंचायत कार्यालयाला आज टाळे ठोकले. दरम्यान जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या सुनीताताई भांगरे यांना हे समजताच त्यांनी तत्काळ गावात येत गटविकास अधिकाऱ्यांशी संपर्क साधत त्यांच्या कानावर महिला, ग्रामस्थ यांच्या भावना टाकल्या.

ग्रामसेवकाच्या हलगर्जीपणामुळे एक महिन्यापासून पिण्याच्या पाण्याची वणवण असून नागरिकांना विहिरीतील खराब पाणी प्यावे लागत आहे. आदिवासी भागातील कोहंडी हे अत्यंत महत्त्वाचे गाव आहे. जवळच एक किलोमीटरवर निळवंडे धरणाचा बॅकवॉटर मात्र आजही पिण्याच्या पाण्यासाठी महिलांना भटकंती करावी लागते.

कोहंडी येथे ग्रामसेवक शिंदे असून ते कधीही मुख्यालयी थांबत नाहीत.पंधरा-वीस दिवसातून एकदा येतात. अर्धा तास थांबतात आणि निघून जातात मात्र स्थानिक लोकांना खूप त्रास सहन करावा लागत आहे.अनेक अडीअडचणींना सामोरे जावे लागते. असे महिलांचे म्हणने आहे. स्वातंत्र्याच्या ७५ वर्षानंतर देखील आदिवासी भागातील ही सत्य परिस्थिती पाहताना पुढारी आणि अधिकाऱ्यांच्या संवेदना जातात कुठे हे समजत नाही? असा संतप्त सवाल महिला करत होत्या. आम्ही काय मागतो तर पाणी स्वच्छ पाणी देण्यास जर एक महिना लागत असेल तर नेमके काय समजायचे. आदिवासी भागातील लोक हे खूप स्वाभिमानी असून त्यांचा उद्रेक झाला तर पळता भुई थोडी होईल हे प्रशासन आणि पदाधिकारी यांनी समजून घ्यावे असा इशारा येथील महिलांनी दिला.

कोहंडी येथील महिलांनी अगस्ती कारखान्याच्या उपाध्यक्षा सुनीताताई भांगरे यांच्याशी संपर्क साधला. भांगरे या गावात पोहचल्या. महिलांच्या भावना लक्षात घेतल्या. कोणत्याही परिस्थितीत आत्ताच्या आत्ता महिलांना पाणी मिळाले पाहिजे अशी भूमिका घेतली. त्यांनी गटविकास अधिकारी यांचेकडे यासंदर्भात तक्रार केली असता माझ्याकडे याबाबत तक्रारी येत नाहीत. आदिवासी भागातील जनता, त्यातल्या त्यात महिला या अशिक्षित असून त्यांना एखाद्या अधिकाऱ्याच्या विरुद्ध तक्रार कशी करावी इथपासून ते कोणाकडे करावी याबाबत काहीच माहिती नसते. त्या कधी लवकर पुढे येऊन सुद्धा बोलू शकत नाही याचाच गैरफायदा ग्रामसेवक शिंदे हे घेतात असे महिलांचे म्हणने आहे. शिंदे हे गावात कधी तरी उगवतात. माझी बदली करा अशी उद्धट भाषा ते महिलांपुढे वापरतात. प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांचा कोणत्याही प्रकारचा धाकदरारा अधिकारी वर्गात शिल्लक



नसल्याने अधिकाऱ्यांची मनमानी चालू आहे. दूषित पाण्यात टीसीएल टाकायचे सुद्धा काम केले जात नाही. लहान मुलं आजारी पडून हजारो रूपये दवाखान्याचे बिल भरावे लागत असल्याचे महिलांचे म्हणणे आहे. त्यांच्या भावना प्रचंड तीव्र होत्या परंतु त्या ऐकण्याच्या परिस्थितीत सुद्धा ग्रामसेवक नव्हते.

ग्रामसेवक शिंदे यांना श्रीमती भांगरे यांनी चांगलेच धारेवर धरले. आजच टँकरची व्यवस्था करतो असे शिंदे यांनी सांगितले. आज दुपारपर्यंत पाणी नाही आले तर पुन्हा फोन करा मी पुन्हा येते असे म्हणत श्रीमती भांगरे यांनी महिलांना आधार दिला.

आदिवासी भागातील परिस्थिती बिकट असून शेतीचे पाणी सोडा, पिण्याचे पाणी देखील मिळत नाही. त्यामुळे विकासाच्या गप्पा मारणार्यांनी जरा या माझ्या मायमाऊल्यांचा प्रश्न समजून घेऊन कायमस्वरूपी तोडगा काढावा, जमत नसेल तर आपल्या खुर्च्या खाली कराव्या, असा टोला सुनीताताई भांगरे यांनी लोकप्रतिनिधी यांना लगावला.

### त्यांना शिव्या, श्राप लागतील


■ आम्हाला आमच्या हक्काचे पाणी द्या, आमचे पाणी जायकवाडी पर्यंत जाते, शेतीला पाणी जाते, उद्योग व्यवसायांना पाणी जाते मात्र आम्हाला प्यायला पाणी नाही, आमच्या लहान मुलांच्या शिव्या श्राप गलेलठ्ठ पगार घेणारे आमच्या जीवावर निवडून येणारे यांना लागल्याशिवाय राहणार नाही अशा संतप्त प्रतिक्रिया येथील महिलांनी पत्रकारांशी बोलतांना व्यक्त केल्या.

SPOT NEWS

# डॉ. मेधाताई कांबळे यांच्या आठवणीतील शेवगाव पुस्तकाचे शनिवारी प्रकाशन

**● शेवगाव । वीरभूमी –**

ज्येष्ठ सामाजिक व राजकीय कार्यकर्त्या, सिद्धहस्त लेखिका डॉ. मेधाताई कांबळे लिखित 'आठवणीतील शेवगाव' या ग्रंथाचा प्रकाशन सोहळा शनिवार दिनांक १८ मे रोजी सकाळी साडे दहा वाजता संपन्न होत आहे. येथील शेवगाव – मिरी रोडवरील ममता लॉन्स मध्ये हा शानदार सोहळा तालुक्याचे भूमिपुत्र, सेवानिवृत्त आयुक्त डॉ. पुरुषोत्तम भापकर यांच्या हस्ते व प्रसिद्ध साहित्यिक, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. सदानंद मोरे यांचे अध्यक्षतेखाली तसेच शेकडो निराधार मनोरुग्णांना आधार देऊन सांभाळ करणाऱ्या, देहरे येथील माऊली प्रतिष्ठानचे प्रवर्तक डॉ. राजेंद्र धामणे व प्रसिद्ध साहित्यिक कैलास दौंड आदी मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होत आहे. तरी या सोहळ्यास उपस्थित राहावे, असे आवाहन सोहळ्याचे संयोजक असिस्टंट कमांडंट नरेंद्र गच्ची यांनी केले आहे.




# कोळपेवाडी परिसरात चोरट्यांचा उच्छाद

**● कोपरगाव । वीरभूमी –**

कोपरगाव तालुक्यातील कोळपेवाडी परिसरात चोरट्यांनी उच्छाद मांडला असुन शेतकऱ्यांच्या ईलेक्ट्रीक मोटारी चा तपास पोलीस यत्रंणेला लागलेला नसतांना निर्ढावलेल्या चोरट्यांनी पुन्हा ट्रक्टरच्या बॅटऱ्याची चोरी करत पोलीस यत्रंणेला आव्हान दिले आहे. कोळपेवाडी – कोपरगाव रस्त्यावरील हनुमान नगर येथील रहिवासी भाऊसाहेब तोरे यांच्या गुरुक्रुपा वर्कशॉप समोर उभ्या केलेल्या एमएच १७, एई ७४४ क्रमांकाचा स्वराज ट्रक्टर ची सहा हजार रुपये किंमतीची चालू बॅंटरी पान्हाच्या साह्याने खोलुन बुधवारी रात्री मोटारसायकल वरुन पोबारा केला. सकाळी शेती कामासाठी तोरे ट्रक्टर चालू गेले असता बॅंटरी चोरीचा प्रकार उघडकीस आला वर्कशॉपमध्ये बसवलेल्या सी. सी. टिव्ही मध्ये चोरीचा सर्व घटनाक्रम कैद झाला आहे. काही दिवसा पुर्वी सुरेगाव नदी पात्रातील अठरा ईलेक्ट्रीक मोटारीचे तांबे चोरून शेतकऱ्यांचे हजारो रुपयाचे नुकसान केले होते. तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध वाळु गुटखा, मटका, गांजा, बिंगो लाँटरी, हातभट्टी, गावठी दारू या धंद्याना पोलीसांच्या अर्थपूर्ण संबधा मुळे सुगिचे दिवस आले असुन पोलीस दादा कडुन अवैध धंद्ये करणार्या भाई दादाना मिळणाऱ्या सन्माना मुळे दोन नंबर चे क्षेत्र तरुणांना खुनावत असल्याने अनेक जन अवैध धंद्यात नशीब आजमवत आहे. तर वारंवार चोरी करण्यात चटावलेले चोरटे नागरिकांचे बंद घरे, मुद्दे मालदुकान फोडी, मोटार सायकली चोरीच्या घटनाना लक्ष करत आहेत.

# महिला शेतकऱ्याच्या गाई चोरणाऱ्याला अटक

## श्रीगोंदा पोलिसांची कारवाई । दोन गाईसह ५ लाखांचा मुद्देमाल जप्त

**● श्रीगोंदा । वीरभूमी –**

१९ एप्रिल रोजी श्रीगोंदा येथील साळवणदेवी रस्त्याच्या कडेला राहणाऱ्या धुमाळ कुटुंबियांच्या दोन जर्सी गाईंची अज्ञात व्यक्तींनी चोरी केली होती. याबाबात शेतकऱ्याने पोलिस ठाण्यात तक्रार दिल्यानंतर श्रीगोंदा पोलिसांना अत्यंत बारकाईने तपास करत गाई चोर अमर अशोक रसाळ याला ताब्यात घेऊन अटक केली आहे. त्याच्याकडून दोन जर्सी गाई, त्यांची वाहतूक करणाऱ्या टेम्पोसह ५ लाख ३५ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे.



याबाबत सविस्तर माहिती अशी की, १९ एप्रिल रोजी साळवणदेवी रस्त्यावर राहणाऱ्या सविता अशोक धुमाळ यांच्या गोठ्यात बांधलेल्या ३५ हजार रूपयांच्या. दोन जर्सी गाई अज्ञात व्यक्तीने टेम्पोच्या सहाय्याने चोरून नेल्या होत्या. याबाबत सविता धुमाळ यांनी श्रीगोंदा पोलिस ठाण्यात फिर्याद दिली होती. या चोरीचा तपास पोलिस निरिक्षक ज्ञानेश्वर भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस मुख्य हवालदार मुकेशकुमार बढे करत होते. अत्यंत गोपनीय व काळजीपूर्वक तपास करत असताना श्री. बढे यांना माहिती मिळाली की, या जर्सी गाई अमर अशोक रसाळ (वय २७ वर्षे, रा. शेडगांव, ता. श्रीगोंदा) याने चोरून नेऊन पुणे जिल्ह्यातील चाकण येथील गुरांच्या बाजारात विकल्या आहेत. पोलिसांनी संशयीत आरोपी अमर रसाळ याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने गुन्ह्यांची कबुली दिली.

आरोपी अमर रसाळ याला अटक करून त्याने विकलेल्या गाई व गाईंच्या वाहतुकीसाठी वापरलेला टेम्पो असा ५ लाख ३५ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. दोन्ही गाई मालक असलेल्या सविता धुमाळ यांच्या ताब्यात दिला आहेत. पुढील तपास हवालदार मुकेशकुमार बढे करत आहेत.

ही कारवाई पोलीस अधिक्षक, अप्पर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे, उपविभागीय पोलिस अधिकारी विवेकानंद वाखारे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरिक्षक ज्ञानेश्वर भोसले, श्रीगोंदा शहर बीट हवालदार मुकेशकुमार बडे, गणेश गाडे यांनी केली आहे.

# भ्रष्टाचारी, अनागोंदी आणि टोलवाटोलवी करणाऱ्या लोकप्रतिनिधी विरुद्ध सविनय डिच्चूकावा

**● नगर । वीरभूमी –**

देशाच्या संसदीय लोकशाहीमध्ये विश्वासहार्य लोकप्रतिनिधींना प्राधान्य देऊन भ्रष्टाचारी, अनागोंदी आणि टोलवाटोलवी करणाऱ्या लोकप्रतिनिधी विरुद्ध सविनय डिच्चूकावा या लोकास्त्राचा जाणीवपूर्वक वापर करावा, यासाठी लोकभज्ञाक जागृती मोहीम सुरू केली असल्याची माहिती ॲड. कारभारी गवळी यांनी दिली.

छत्रपती शिवाजी महाराजांचा डिच्चूकावा की ज्यामध्ये भ्रष्टाचारी आणि टोलवाटोलवी करणाऱ्या व्यक्तीला समाजातून कायमचे दूर करण्याचे तंत्र वापरले जात होते. त्याचबरोबर महात्मा गांधीजींचा सत्य आणि अहिंसेवर आधारित सविनय मार्ग यांचे संकरातून लोकभज्ञाक चळवळीने डिच्चूकावा जारी केला आहे.

समाजाच्या प्रत्येक व्यवहारात विश्वासाला महत्त्व दिले जाते. परंतु अनेक लोक आपल्यावर ठेवलेल्या विश्वासाचा गैरफायदा घेऊन भ्रष्टाचार करतात. संसदीय लोकशाहीत निवडून गेलेल्या नगरसेवकांपासून खासदारांपर्यंतचे लोक सत्ता, संपत्ती आणि प्रतिष्ठा मिळविण्यासाठी लोकांचा विश्वासघात करतात याला आळा बसविण्यासाठी सविनय डिच्चूकावा तंत्राशिवाय पर्याय नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. कोरोना महामारीच्या काळात अनेक संधीसाधू डॉक्टरांनी लाखो रुपयांची बिलं करून कोरोनाग्रस्त रुणांची प्रेत फक्त परत दिली. त्यातून कोट्यावधी रुपये अशा डॉक्टरांनी मिळविले. अनेक डॉक्टरांविरुद्ध रुणांचे नातेवाईकांनी थकविलेले पैसे परत घेण्यासाठी आजही तगादा लावला आहे. त्यामुळे अशा डॉक्टरांविरुद्धसुद्धा सविनय डिच्चूकावा लोकांनी वापरावा अशा डॉक्टरांपासून आणि दवाखान्यांपासून लोकांनी दूर रहावे असा आग्रह संघटनेने धरला आहे. अनेक पेट्रोल पंपावर बाजार भावने पैसे घेऊनही पेट्रोल चोरले जाते याला, मापात पाप असे म्हणतात. अशा पेट्रोल पंपावर तमाम जनतेने सविनय डिच्चूकावा वापरण्याचे प्रसिध्दीपत्रकात म्हंटले आहे. समाजातील अनेक ढोंगी, लबाड, भ्रष्टाचार करणाऱ्या घटकांविरुद्ध सविनय डिच्चूकावा यासारखे नामी तंत्र नाही, असे संघटनेने जाहीर केले. कोणत्याही न्यायालयातून अशा ढोंगी आणि भ्रष्टाचारी लोकांना सजा करणे अवघड आहे. त्यामुळे लोकचळवळीतूनच याला यश येणे आवश्यक असल्याचे ॲड. गवळी यांनी भूमिका स्पष्ट केली आहे.

# दुष्ट प्रवृत्तीचा संहार व भक्ताचे रक्षणार्थ नृसिंह अवतार : सुरासे महाराज

**● कोपरगाव । वीरभूमी –**

पृथ्वीतलावरील दुष्ट प्रवृत्तीचा संहार व भक्ताच्या रक्षणार्थ मानव कल्याणासाठी भगवान नृसिंह अवतार परमात्म्याने धारण केला आहे. असे प्रतिपादन साई कथाकार ह.भ.प. बाळकृष्ण सुरासे महाराज यांनी केले आहे.

कोपरगांव तालुक्यातील कान्हेगाव येथे नृसिंह जयंती निमित्ताने आयोजित जप अनुष्ठान व हरिनाम सप्ताहातील किर्तनात ते बोलत होते ते पुढे म्हणाले की, गौतमी गोदावरीच्या तिरावर वसलेले कान्हेगाव येथील नृसिंह मंदिर हे पुरातन स्थान आहे. नगर जिल्ह्यातील एकमेव मंदिर आहे. भगवंताचा हा नृसिंह अवतार चिंतनीय आहे. ज्या ज्या वेळेसे मानवाचे जीवन धोक्यात येते त्या त्या वेळेस ईश्वर अशाही अवतारात प्रगट होऊन सज्जनांचे रक्षण करीत असतो, नृसिंह दर्शनाने मनुष्य जीव निर्भर होऊन त्याचा आत्मविश्वास बळावतो, मानसिक मनोधैर्य गमावलेल्या मनुष्याने भगवान नृसिंहाची सेवा केल्यास विशेष लाभ होतो असेही त्यांनी त्यांच्या किर्तनातुन सांगितले.



प्रतिवर्षी कान्हेगांव येथे नृसिंह नवरात्र साजरे होत असते. यावर्षी जप अनुष्ठान व नाम सप्ताह, नृसिंह पुराण, किर्तन, प्रवचने असा धार्मिक कार्यक्रम मोठ्या उत्साहात कान्हेगांव ग्रामस्थ साजरा करीत आहे. जप अनुष्ठानाच्या निमित्याने अनेक भाविकांनी उपस्थिती दर्शविलेली आहे. तसेच नृसिंह पुराण, वाचन, ७ दिवस होत आहे. पहाटे काकडा भजन, सायंकाळ हरिपाठ व जप, असे आयोजन केलेले आहे.

परमानंद गिरीजी महाराज यांचा संत्सगांचा लाभही भाविक घेत आहे. दररोज, महाप्रसादाचे आयोजन असुन भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहत आहेत.

या प्रसंगी कान्हेगाव भजनी मंडळाचे विशेष सहकार्य लाभले. परिसरातील भाविकांनी या नाम सप्ताहाचा लाभ घ्यावा, असे आव्हान कान्हेगाव ग्रामस्थांनी केले आहे.

## भाऊ, कोण चाललं तुमच्या भागात

# कमळ फुललं की तुतारी वाजली...


## सर्वांनाच उत्सुकता आता निकालाची । मतमोजणी पुर्वीच्या चर्चांनी सर्वच बाजार गरम

**■ अनिल खाटेर**

**● पाथर्डी । वीरभूमी –**

लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यात १३ मे रोजी किरकोळ प्रकार वगळता शांततेत झालेल्या मतदानाने प्रशासकीय यंत्रणेसह पोलीस विभागाने सुटकेचा निःश्वास सोडला. मतदानांची सरासरी टक्केवारी वाढली. पण आता राजकीय वर्तुळासह सर्वसामान्य मतदारांनाही आता कोण निवडून येणार, कोणत्या तालुक्यात कोणाला जास्त मतदान पडले, कोणाला कोणत्या भागातून मताधिक्य मिळेल हे जाणून घेण्याची उत्सुकता लागली आहे. त्यामुळे एकमेकांना भाऊ, कोण चाललं तुमच्या भागात, तुतारी वाजली का कमळ फुललं असे आवर्जून विचारले जात असल्याचे दिसून येत आहे.

लोकसभा मतदारसंघात यावेळी मतदानाचा टक्का किंचित वाढला आहे. शहरापेक्षा ग्रामीण भागात अधिक उत्साह असल्याचे पाहायला मिळाले. निवडणूक आयोगाने मतदान वाढविण्यासाठी राबविलेल्या विविध उपक्रमांसोबत ग्रामीण भागातील राजकारण, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लांबलेल्या निवडणुका व दबक्या पावलांनी झालेली आर्थिक उलाढाल ही कारणेही मतदान वाढीमागे असल्याचे सांगण्यात येते. आता यावरून निकालाचे अंदाज बांधले जाऊ लागले आहे. महायुतीचे उमेदवार डॉ. सुजय विखे आणि महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांच्यात अटीतटीची लढत झाली आहे. त्यामुळे आता मतदानाच्या आकडेवारीवरून विजयाची गणिते मांडली जाऊ लागली आहेत. तर दुसरीकडे प्रशासनाकडून अनेकदा सुधारित आकडेवारी जाहीर केली जात असताना टक्केवारीत वाढ झाल्याचे दिसून येत असल्याने त्याचीही चर्चा सुरू झाली आहे.



गेल्यावेळी ६४.७९ टक्के मतदान झाले होते. यावेळी ते ६६.६१ टक्के मतदान झाले. यावर्षी नगर शहर विधानसभा मतदार संघात सर्वात कमी म्हणजे ६२.५० टक्के मतदान झाले. तर सर्वाधिक ७०.१३ टक्के मतदान पारनेरला झाले. राहुरीला ७० टक्के, शेवगावला ६३.०३ टक्के, श्रीगोंद्याला ६७.९० टक्के आणि कर्जत जामखेडला ६६.१९ टक्के मतदान झाले. या मतदार संघात १९ लाख ८१ हजार ८६६ मतदानापैकी १३ लाख २० हजार १६८ मतदारांनी मतदान केले आहे. नगर शहरात मुस्लिम आणि अल्पसंख्याक भागात मोठ्या प्रमाणावर मतदान झाले आहे. यापूर्वी या भागात एवढ्या मोठ्या संख्येने मतदार बाहेर पडल्याचे पाहिले नसल्याचे लोक सांगतात.

आता यावरून विजयाची गणिते मांडली जाऊ लागली आहेत. एकूण मतदानासोबतच कोणत्या विधानसभा क्षेत्रात किती मतदान झाले, यावरून गणिते मांडली जात आहेत. गेल्यावेळी महायुतीचे उमेदवार खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांना सुमारे ७ लाख मते मिळाली होती, तर राष्ट्रवादीचे उमेदवार संग्राम जगताप यांना ४ लाख २० हजार मते मिळाली होती. विखे २ लाख ८० हजार मतांनी विजयी झाले होते.

अर्थात यावेळी सगळी राजकीय समीकरणे मोठ्या प्रमाणात बदलली आहे. एवढेच नव्हे तर उलटी पालटीही झाली आहेत. यावेळी विखे यांच्याविरोधात महाविकास आघाडीचे नीलेश लंके यांनी निवडणूक लढविली. ते लोकसभा निवडणुकीला प्रथमत: सामोरे जात आहेत. २०१९ मध्ये पारनेर विधानसभा मतदारसंघातून ते आमदार झाले होते.

नगर शहरासह सर्वच ठिकाणी भाजप आघाडी घेईल, असे भाजप समर्थक बोलत असुन मागील वेळेपेक्षा यावेळी मताधिक्य घटले तरी विजय आमचाच होणार असे बोलले जात आहे तर कर्जत-जामखेड, पारनेरसह ग्रामीण भागात तुतारीला भरघोस प्रतिसाद मिळाला असल्याचे महाविकास आघाडीचे कार्यकर्ते सांगत आहेत. त्यामुळे गुलाल आमचाच असे दोन्ही बाजुचे कार्यकर्ते ठणकावून सांगत आहेत. काही ठिकाणी बॅनर तर काही ठिकाणी पेढे वाटत फटाके फोडत जल्लोष साजरा केला जात आहे. असे असली तरी अंतिम निकालासाठी मात्र चार जूनची वाट सर्वांना पहावी लागणार आहे.

# क्षणोक्षणी निराकार प्रभुच्या प्रति समर्पित होऊन जीवन जगावे : सद्‌गुरु माता सुदीक्षाजी महाराज

**● नगर । वीरभूमी –**

जेव्हा आपण क्षणोक्षणी या निराकार प्रभुच्या प्रति पूर्ण समर्पित होऊन आपले जीवन जगतो तेव्हाच खर्या अर्थाने आपले जीवन मानवतेच्या कल्याणार्थ समर्पित होऊन जाते. असेच प्रेमा-भक्तीने परिपूर्ण जीवन बाबा हरदेव सिंहजी यांनी स्वत: जगून आम्हाला दाखवले, असे आशिर्वचन सद्गुरु माता सुदीक्षाजी महाराज यांनी समालखा येथे बाबा हरदेव सिंहजी महाराज यांच्या स्मृतित आयोजित 'समर्पण दिवस'च्या मुख्य सत्संग कार्यक्रमात व्यक्त केले. त्यांच्या समवेत स्टेजवर निरंकारी राजपिता रमितजी विराजमान होते.

कार्यक्रमात बाबाजींच्या प्रेम, करुणा, दया व समर्पण आदि दिव्य गुणांचे वर्णन मिशनच्या अनेक वक्त्यांनी गीत, भजन, कवितांच्या माध्यमातून व्यक्त करुन त्यांना हृदयपुर्वक श्रद्धा सुमने अर्पित करीत त्यांच्या अनुपम जीवनाला नमन केले. 'समर्पण दिवस'चे कार्यक्रम देशभर तसेच विदेशात ही साजरा करण्यात आले.

निरंकारी मंडळाच्या नगर शाखेच्या वतीने सुद्धा मिस्कीन रोड, नगर येथील संत निरंकारी सत्संग भवन येथे सायं. ७ ते ९ या वेळेत 'समर्पण दिवस' निमित्त सत्संग कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. मुख्य मंचावर बहन आरती चावला (श्रीरामपूर) विराजमान होत्या. त्यांनी बाबा हरदेव सिंहजींच्या परोपकारी जीवनाची, त्यांच्या शिकवणूकी विषयी भाविकांना अवगत केले. याप्रसंगी नगर शहर व परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. असेच सत्संग कार्यक्रम जिल्हाभर आयोजित करण्यात आले होते.

सद्गुरु माताजी पुढे म्हणाल्या, बाबा हरदेव सिंहजींनी स्वत: प्रेमाचे मुर्तीमंत रुप बनून नि:स्वार्थ भावनेने जीवन जगण्याची कला शिकविली.

शेवटी माताजींनी सांगितले की, जेव्हा अपण परमात्म्यावर खरे प्रेम करु लागतो, तेव्हा मायावी संसरातील लाभ- हानीचा प्रभाव आमच्यावर पडत नाही, त्या परिस्थितीत प्रभु प्रेम आणि प्रभु इच्छा ही सर्वोपरी बनून जाते. नि:संदेह प्रेमाचे मुर्तिमंत रुप असलेले बाबा हरदेव सिंहजी यांची करुणामय अनुपम छबी प्रत्येक श्रद्धालू भक्तांच्या हृदयात अमिट छाप बनून राहिली असून, त्यांच्या अनंत उपकारांबद्दल निरंकारी जगतातील प्रत्येक भक्त सदैव ही ऋणी राहील.

# SPOT NEWS

## सथ्था कॉलनी परिसरात घाण पाणी; दुरुस्तीचे काम सुरु

**● नगर । वीरभूमी –**

प्रभाग क्र.११ मधील सथ्था कॉलनी, नवजीवन कॉलनी, आदिनाथ कॉलनी आदि परिसरात गेल्या काही दिवसांपासून पिण्याचे पाणी घाण येत असल्याने नगरसेवक अविनाश घुले यांनी तातडीने दखल घेत मनपा पाणी पुरवठा विभागाने दुरुस्ती सुरु केले आहे. यावेळी इंजि. राहुल गिते उपस्थित होते. प्रभाग क्र.११ मधील सथ्था कॉलनी, नवजीवन कॉलनी, आदिनाथ कॉलनी आदि परिसरात गेल्या काही दिवसांपासून पिण्याच्या पाण्याच्या लाईनमधून घाण पाणी येत होते. याबाबत येथील नागरिकांनी अविनाश घुले यांना माहिती दिली. त्यांनी तातडीने मनपाच्या पाणी पुरवठा विभाग, आरोग्य विभाग यांच्याशी संपर्क साधून संबंधितांना सूचना दिल्या. त्यानंतर मनपाचे इंजि.राहुल गिते यांनी कर्मचार्यांसह परिसरातील पिण्याची पाईप लाईन व ड्रेनेज लाईन कुठे लिक आहे, फॉल्ट कुठे आहे याची तपासणी करुन दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले.

## डॉ. पाउलबुधे फार्मसीच्या आठ विद्यार्थ्यांची मोठ्या कंपनीत निवड

**● पाथर्डी । वीरभूमी –**

वसंत टेकडी येथील सेवा शिक्षण प्रसारक मंडळाच्या डॉ. ना.ज. पाऊलबुद्धे कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयातील आठ विद्यार्थ्यांची छत्रपती संभाजीनगर मधील कन्सेप्ट फार्मास्युटिकल कंपनीत अंतिम परीक्षेपुर्वीच चांगले पॅकेजवर नोकरीसाठी निवड झाली आहे. यामध्ये ऋषिकेश संगपाल, ज्ञानेश्वरी सांगडे, निखिल घोरपडे, आयन पटेल, प्रिया चोथे, अमन शेख, अल्तमस शेख आणि दत्तात्रय चौधरी यांचा समावेश आहे. मुलाखतीपूर्वी कॉलेजने आयोजित केलेल्या कार्यशाळेत मुलाखतीला कसे सामोरे जावे, कोणते प्रश्न विचारले जातात, सध्याची कंपन्यांची परिस्थिती असे विविध स्तरावर विद्यार्थ्यांची तयारी करुन घेण्यात आली होती. तसेच माजी विद्यार्थ्यांचा मेळावा आयोजित केल्याचा फायदा विद्यार्थ्यांना नोकरीसाठी झाला. अंतिम परीक्षा होण्यापूर्वीच उत्तम पॅकेज असलेल्या नोकरीची संधी उपलब्ध झाल्याने विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभाग प्रमुख डॉ. प्रसाद घुगरकर व प्रा. मोहसीन शेख यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले.

## वच्छलाबाई निकम यांचे निधन

**● शेवगाव । वीरभूमी –**



तालुक्यातील मळेगाव येथील जुन्या पिढीतील तसेच धार्मिक कार्याची आवड असणाऱ्या गं.भा. वच्छलाबाई रामकिसन निकम (वय १०१) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांनी मोठ्या कष्टातून आपला संसार फुलविला. त्या शांत, संयमी तसेच मितभाषी स्वभावाच्या होत्या. त्यांच्या पश्चात मुले, मुली, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. नेवासा एस.टी. आगाराचे माजी व्यवस्थापक शामसुंदर निकम व चालक भिमराज निकम यांच्या त्या आई तर चापडगाव हायस्कूल येथील शिक्षक अमोल निकम यांच्या त्या आजी होत. त्यांच्या जाण्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# वीज पडून गाय, बैल व तीन मेंढ्या दगावल्या

### बक्तरपुर येथे गारांचा पाऊस । आ. आशुतोष काळेंच्या सूचनेनुसार तातडीने पंचनामा

**● कोपरगाव । वीरभूमी –**

अवकाळी पावसामुळे मंगळवार (दि.१४) रोजी सायंकाळी पाच वाजेच्या सुमारास कोपरगाव तालुक्यातील बक्तरपूर येथे वादळी वाऱ्यासह गारांचा पाऊस सुरु होवून वीज पडल्यामुळे एक गाय, एक बैल व तीन मेंढ्या दगावल्या असून गारांच्या पावसामुळे डाळिंब पिकांचे देखील मोठे नुकसान झाले आहे. याबाबतचे वृत्त समजताच आ.आशुतोष काळे यांनी प्रशासनाला तातडीने पंचनामा करण्याच्या सूचना दिल्यामुळे प्रशासनाकडून पंचनामा प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून जागेवरच पशु–वैद्यकीय अधिकाऱ्यांनी मृत जनावराचे शवविच्छेदन करून झालेल्या नुकसानीचा अहवाल प्रशासनाकडे सादर केला आहे.



याबाबत सविस्तर वृत्त असे की, मंगळवार (दि.१४) रोजी कोपरगाव तालुक्यातील बक्तरपूर येथे वादळी वाऱ्यासह गारांचा पाऊस झाल्यामुळे उभ्या डाळिंब पिकांचे मोठे नुकसान झाले असून सोसाट्याच्या वाऱ्यामुळे डाळींबाची झाडे उन्मळून पडली आहे. त्यामुळे आर्थिक अडचणीत असलेल्या असलेल्या शेतकऱ्यांच्या अडचणी अधिकच वाढल्या आहेत. तसेच वीज कोसळल्यामुळे तीन मेंढ्या व गिर जातीची गाय व बैल यांचा देखील बळी घेतला आहे.

सदरच्या घटनेची माहिती समजताच आ.आशुतोष काळे यांनी तहसीलदार संदीपकुमार भोसले यांना सदरच्या घटनेचा पंचनामा करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्या सुचनेनुसार बुधवार (दि.१५) रोजी सकाळी चासनळीच्या कामगार तलाठी दिपाली विधाते, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. मिलिंद कराळे, डॉ. दिलीप जामदार यांनी मृत जनावरांचे शवविच्छेदन करत सदर घटनेचा पंचनामा करून झालेल्या नुकसानीचा अहवाल प्रशासनास सादर केला आहे. तसेच कृषी विभागाचे योगेश माळी यांनी गारपिटीमुळे डाळिंब पिकांचे झालेल्या नुकसानीची पाहणी केली. यावेळी ग्रामसेवक एफ.एम.तडवी, पोलीस पाटील भारत सानप, ग्रामपंचायत सदस्य नाना सानप, गणेश नागरे, माजी सरपंच संजय बोडखे, संजय सानप आदी उपस्थित होते.

## साईबाबा संस्थानच्या रुग्णालयाला एक कोटी रुपयांचे एक्स-रे मशीन साई भक्ताकडून दान

**● श्रीगोंदा । वीरभूमी –**

'सबका मालिक एक' आणि 'श्रद्धा सबुरी'चा संदेश देणाऱ्या साईबाबांच्या झोळीमध्ये देश विदेशातील साई भक्त भरभरून दान करत असतात. मंगळवारी एका साई भक्ताने साई चरणी मोठे दान करत साईबाबा संस्थानच्या रुग्णालयाला एक कोटी रुपयांचे एक्स–रे मशीन दान स्वरूपात दिले आहे. या दानामुळे साईबाबा संस्थानच्या रुग्णालयात उपचार घेणाऱ्या रुग्णांना याचा मोठ्या प्रमाणात फायदा घेता येणार आहे.




साईबाबा संस्थानचे साईबाबा हॉस्पिटल व साईनाथ रुग्णालयाच्या एक्स रे विभागाकरीता मायलॉन लॅब्रोटरीज यांचेकडून एकूण ०१ कोटी १५ लाख रूपये किंमतीचे दोन अद्यावत एक्स–रे मशिन देणगी स्वरुपात प्राप्त झाले असल्याची माहिती साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी दिली. सदर मशीन साईबाबा हॉस्पिटल व साईनाथ रूग्णालयाच्या एक्स–रे विभागात बसविण्यात येऊन त्यांची मायलॉन कंपनीचे अध्यक्ष राजीव मलिक व त्यांच्या सुविद्य पत्नी सिमा मलिक यांचे हस्ते पुजा करुन उदघाटन करण्यात आले. यानंतर साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांचे हस्ते देणगीदार साईभक्त राजीव मलिक व सिमा मलिक यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी मायलॉन कंपनीचे व्यवस्थापक जितेंद्र खैरे, साईबाबा हॉस्पिटलचे वैद्यकिय संचालक डॉ. प्रितम वडगावे, वैद्यकिय अधिक्षीका डॉ. मैथिली पितांबरे, जनसंपर्क अधिकारी तुषार शेळके, अधिसेविका मंदा थोरात, नजमा सय्यद, बायोमेडीकल विभागाचे इंजिनिअर राजेश वाकडे, तुषार कुटे, श्रध्दा कोते व स्टोअर किपर सुनिल निकम आदी उपस्थित होते.

### दादाजी वैशंपायन अध्यात्मिक व सामाजिक कार्यगौरव पुरस्कार


## नारायण भाटे, डॉ. धर्मवीर भारती, मिलिंद चवंडके यांना जाहीर



नारायण भाटे



डॉ. धर्मवीर भारती



मिलिंद चवंडके

**● शेवगाव । वीरभूमी –**

येथील गुरुदत्त सामाजिक प्रतिष्ठाणच्या वतीने देण्यात येणारा दादाजी वैशंपायन अध्यात्मिक व सामाजिक कार्यगौरव पुरस्कार जाहीर झाले असून यावर्षीचा अध्यात्मिक पुरस्कार पुणे येथील स्वामी समर्थ कृपांकित नारायण भाटे यांना तर सामाजिक पुरस्कार लातूर येथील निश्चल पुरी फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ. धर्मवीर भारती व नाथ संप्रदायाचे अभ्यासक मिलिंद चवंडके यांना जाहीर झाला असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष अर्जुनराव फडके व सचिव फुलचंद रोकडे यांनी दिली.

गुरुदत्त सामाजिक संस्थेच्या वतीने सन २०१० पासून दरवर्षी अध्यात्मिक क्षेत्रात व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तिंना अध्यात्मिक व सामाजिक पुरस्कार देवून गौरवण्यात येते.११ हजार रुपये रोख, स्मृतीचिन्ह व सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरुप असून गुरुवार दि. २३ मे रोजी दुपारी ३.३० वाजता शेवगाव येथील प.पू.दादाजी वैशंपायन दत्त देवस्थान येथे नाशिक येथील प.पू. गजानन कस्तुरे, मुंबई येथील वित्त विभाग एमएसडीलचे संचालक अनुदिप दिघे आदींच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. यावेळी आमदार मोनिका राजळे, माजी आमदार चंद्रशेखर घुले, मुंबई येथील रिलायन्सचे सिनिअर एक्जुटिव्ह व्हा. प्रेंसिडेट गणेश राममूर्ती, तहसिलदार प्रशांत सांगडे, शरदकाका वैशंपायन, प्राचार्य डॉ. महेंद्र गौशाल, उदय देशपांडे, रवींद्र पुसाळकर, प्रशांत दिघे, सार्वजनिक बांधकाम उपविभागीय अभियंता प्रल्हाद पाठक आदी प्रमुख उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमासाठी अध्यात्मिक, धार्मिक क्षेत्रातील नागरीकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन संस्थेचे अध्यक्ष फडके व सचिव रोकडे यांनी केले आहे.

### समता नागरी सहकारी पतसंस्थेच्या श्रीरामपूर शाखेतील

# सेल्फ बँकिंग विड्रॉल सुविधेचा सहकार आयुक्तांच्या हस्ते शुभारंभ

### समता पतसंस्था ही अधिकाधिक अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरणारी राज्यातील एकमेव संस्था ठरली

**● कोपरगाव । वीरभूमी –**

सभासदाला कमी कालावधीत अधिक सेवा देणे हे केवळ अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे शक्य होत आहे. समता नागरी सहकारी पतसंस्था ही अधिकाधिक अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरणारी राज्यातील एकमेव संस्था ठरली असून अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे कमी कर्मचाऱ्यांमध्ये ग्राहक, सभासदांना अधिक सेवा देणारी राज्यातील समता ही एकमेव पतसंस्था ठरेल, असे गौरवोद्गार राज्याचे सहकार आयुक्त शैलेश कोतमिरे यांनी काढले.




समता नागरी सहकारी पतसंस्था श्रीरामपूर शाखेच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त सहकार आयुक्त शैलेश कोतमिरे यांच्या शुभहस्ते पेपरलेस कॅश भरणा व सेल्फ बँकिंग विड्रॉल सुविधा शुभारंभ समता पतसंस्थेचे चेअरमन ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आला होता. त्या वेळी ते बोलत होते.

ते पुढे म्हणाले की, राज्यात पतसंस्था चळवळ सक्षम व बळकट करण्याचे काम राज्य फेडरेशन द्वारा काका कोयटे करत आहेत. त्या प्रमाणेच अत्याधुनिक तंत्रज्ञान व ग्राहकांना कमी कालावधीत अधिक सेवा देण्यात समता नागरी सहकारी पतसंस्था सक्षम बनविली आहे.

सहकार आयुक्त शैलेश कोतमिरे यांचे स्वागत संस्थेच्या संचालक मंडळाच्या वतीने करण्यात आले तर चेअरमन काका कोयटे यांच्या हस्ते त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. प्रास्ताविकातून संचालक संदीप कोयटे यांनी श्रीरामपूरकरांनी पेपरलेस कॅश भरणा व सेल्फ बँकिंग विड्रॉल सुविधेचा लाभ घेण्याचे आवाहन केले.

अध्यक्षीय मनोगतात संस्थेचे चेअरमन काका कोयटे यांनी समता पतसंस्था वापरत असलेल्या विविध अत्याधुनिक तंत्रज्ञान विषयक माहिती दिली. तसेच समता लिक्विडिटी बेस्ड प्रोटेक्शन स्कीम विषयी चित्रफिती द्वारा सादरीकरण करत संस्थेच्या ९९.८१ टक्के ठेवीदारांच्या प्रत्येकी ३५ लाख रुपयापर्यंतच्या ठेवी पूर्णपणे सुरक्षित असल्याचे सांगितले.

या वेळी मल्टीस्टेट पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष सुरेश वाबळे, अहमदनगर जिल्हा सहकारी पतसंस्था स्थैर्य निधीचे संचालक शिवाजी आप्पा कपाळे, रमेश झांबरे, फकीर शेठ पिपाडा, संस्थेचे संचालक अरविंद पटेल, चांगदेव शिरोडे, संदीप कोयटे, गुलशन होडे कांतीलाल जोशी, जनरल मॅनेजर सचिन भट्टड, मुख्य कार्यालयाचे अधिकारी, कर्मचारी, श्रीरामपूर शाखेचे सभासद, हितचिंतक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. उपस्थितांचे आभार शाखाधिकारी फारुख शेख यांनी मानले.

## गोदावरी कालवे सात नंबर पाणी मागणी अर्ज स्विकृतीसाठी शेतकऱ्यांची ससेहोलपट : कोल्हे

**● कोपरगाव । वीरभूमी –**

नाशिक पाटबंधारे खात्यांने नमुना नंबर ७ पाणी मागणी अर्ज भरण्याबाचत शेतकऱ्यांना नुकतेच आवाहन केले आहे मात्र गोदावरी उजवा व डाव्या कालव्याच्या कार्यालयात संबंधी विभागाचे जबाबदार अधिकारी भेटत नसल्याने शेतकऱ्यांची ससेहोलपट होत आहे तेंव्हा ऑनलाईन जमान्यात शेतकऱ्यांचे पाणी मागणी अर्जही ऑनलाईन स्विकारण्यांत यावे अशी मागणी जिल्हा बँकेचे संचालक व सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष विवेकभैय्या कोल्हे यांनी उत्तर महाराष्ट्र प्रदेश जलसंपदा विभागाचे मुख्य अभियंता व नाशिक पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता यांच्याकडे केली आहे.



त्यांनी आपल्या मागणीत पुढे म्हटले आहे की, गोदावरी उजव्या व डाव्या कालव्यांचे आर्युमान ११९ वर्षाचे झालेले आहे. त्याच्या नुतणीकरणाची कामे सुरू आहे. ब्रिटीशकालीन कामे खिळखिळी झाल्याने शेतकऱ्यांना प्रत्येक आर्वतन काळात कालवा फुटीच्या समस्येला तोंड द्यावे लागत आहे. मागील वर्षी पर्जन्यमान जेमतेम झाले, बारमाही गोदावरी कालव्यांच्या भरोशावरच या भागातील शेतकरी पीकपाणी परिस्थितीचे नियोजन करत असतो, विहीरींच्या अल्पशा पाण्यांवर उन्हाळ पिकांचे नियोजन सध्या सुरू आहे मात्र दोन आर्वतनांत जास्तीचा कालावधी पडल्याने शेतकऱ्यांचे पिकाचे नुकसान होत आहे, एन मोसमात त्याच्या पिकांना पाणी मिळत नाही त्यामुळे उत्पादनांत घट होत आहे. सात नंबरवर पाणी मागणी अर्ज मागविण्यांत आले पण संबंधीत सिंचन शाखेत प्रशासकीय यंत्रणा भेटत नाही परिणामी शेतकऱ्यांना सातत्यांने हेलपाटे मारावे लागत आहे. सध्या ऑनलाईनचा जमाना आहे, बहुतांष जलसंपदा विभागाचे कामकाज संगणकीकरण झाले आहे तेंव्हा शेतकऱ्यांचे पाणी मागणी अर्जही ऑनलाईन स्विकारून त्याच्या शेतीला होणारा पाण्याचा पुरवठा त्याचे वेळापत्रक, कालवा आर्वतनाच्या तारखा, त्याच्याकडील सिंचनाची बाकी, फळबागा व अन्य पिकाबाबतची संपुर्ण माहिती शेतकऱ्यांना त्याच्या भ्रमणध्वनीवर पुरवून जलसंपदा विभागांने व नाशिक पाटबंधारे खात्याने त्यात गतीमानता आणावी, जेणेकरून शेतकऱ्यांनाही पाटपाणी पीकपध्दतीबाबत नियोजन करणे सोईचे होईल असेही विवेकभैय्या कोल्हे शेवटी म्हणाले.

वीरभूमी
हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर–४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# जनावरांना व माणसांना टँकरने पाणी द्या

## पागोरी पिंपळगाव ग्रामस्थांचे पाथर्डी तहसील समोर आंदोलन । मंजूर खेपा होत नसल्याचा आरोप

**● पाथर्डी । वीरभूमी –**

तालुक्यातील पागोरी पिंपळगाव येथे टँकरच्या चार खेपा मंजुर असुन एकही खेप पाणी मिळत नाही. कधी टँकर आलेच तर चालक दारु पिलेला असतो. तो रस्त्यावरच पाणी सोडतो. जनावरांना व माणसांना पाणी द्या, अशी मागणी करीत सरपंच व ग्रामस्थांनी तहसिल कार्यालयासमोर बुधवारी उपोषण केले.

भाजपाचे कार्यकर्ते यांनी नागरीक व प्रशासनामध्ये मध्यस्ती केली. मंजुर खेपा नियमीत मिळतील. जनावराच्या पाण्याचा प्रस्ताव सादर करा मंजुरी देवु असे आश्वासन पंचायत समितीचे विस्तार अधिकारी आण्णासाहेब गहीरे यांनी दिले. यानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले. सरपंच राजेंद्र दराडे, संपत दराडे, अलीमभाई पटेल, सुनिल पाखरे, बाळासाहेब ढाकणे व नागरीकांनी बुधवारी तहसील कार्यालयासमोर उपोषण केले. उपस्थितांनी प्रांताधिकारी प्रसाद मते यांच्याशी फोनवरून संपर्क साधला व आंदोलकांशी बोलने करुन दिले.



मंजुर खेपा रोज दिल्या जातील. टँकर बदलुन दिला जाईल. टँकर पुरवठा करणाऱ्या ठेकेदाराला पाच वेळा नोटीस बजावल्या आहेत. मात्र त्याच्या कामात सुधारणा होत नाही. त्याच्यावर कारवाई करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे. टँकर ठेकेदाराला बदला. त्याची संस्था काळ्या यादीत टाका, अशी मागणी केली गेली. पंचायत समितीचे विस्तार अधिकारी आण्णासाहेब गहीरे, कासार व महादेव धायतडक यांनी अंदोलकांशी चर्चा केली.

> तालुक्यात पाणी टंचाई गंभीर बनली आहे. २०११ च्या जनगणनेप्रमाणे पाणी दिले जाते हा निकष बदलावा नवीन लोकसंख्येच्या आधारे पाणी द्या. जनावरांना पाणी दिले पाहीजे. पागोरी पिंपळगाव व तालुक्यातील इतर गावांना पाणी नियमीत मिळाले पाहीजे. गळके टँकर दुरुस्त करावेत. पाणी न देता बिले निघतात कसे याची तपासणी केली जावी.
>
> – **सुनील पाखरे,** आंदोलक

# शिलेगावातील विहिरीत आढळला तरुणाचा हातपाय बांधलेला मृतदेह

**● राहुरी । वीरभूमी –**

तालुक्यातील शिलेगाव येथे पाच ते सहा जणांनी विजय जाधव या तरुणाला लाकडी दांड्याने मारहाण करुन हातपाय त्याचे बांधले. नंतर त्याला मुळा नदीपात्रात एका विहिरीत टाकून त्याचा खून केला. ही घटना बुधवारी (दि. १५) सकाळी उघडकीस आली. याप्रकरणी एका संशयितास अटक करण्यात आली आहे.

राहुरी तालुक्यातील शिलेगाव येथे मुळा नदीच्या पात्रात असलेल्या एका शेतकऱ्याच्या विहिरीत बुधवारी सकाळी लाकडी दांडे, चप्पल तसेच एका तरुणाचा मृतदेह पाण्यावर तरंगताना दिसून आला. घटनेची माहिती मिळताच पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्यासह पथकाने घटनास्थळी धाव घेतली. स्थानिक तरुणांच्या मदतीने मृतदेह बाजेवर ठेवून विहिरीतून बाहेर काढला. सदर मृतदेह विजय अण्णासाहेब जाधव (वय ३०, रा. आरडगाव, बिरोबा नगर) याचा असल्याचे समोर आले.

विजय जाधव हा मंगळवारी (दि. १४) कामावर गेला होता. त्यानंतर तो त्याच्या काही मित्रांबरोबर शिलेगाव येथील यात्रेत गेला. यात्रेत विजय जाधव याचे मित्रांबरोबर भांडण झाले. त्यावेळी त्याच्या मित्रांपैकी चार ते पाच जणांनी विजय जाधव याला मारहाण केली होती, अशी माहिती विजय जाधव याचे चुलते रमेश जाधव यांनी दिली.

बुधवारी सकाळी विजय जाधव याचा मृतदेह विहिरीतील पाण्यात आढळून आला. विजय जाधव याच्या नातेवाईकांनी या घटनेतील एका संशयित आरोपीला पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले. दुपारी उशिरापर्यंत राहुरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याचे काम सुरु होते. विजय जाधव यांच्या पश्चात आई, वडील, पत्नी, दोन मुले, सहा भाऊ असा परिवार आहे.

# वसुंधरा अकॅडेमीच्या विद्यार्थ्यांचे सीबीएसई दहावी व बारावी बोर्ड परीक्षेत घवघवीत यश



**● अकोले । वीरभूमी –**

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (सीबीएसई) वतीने घेण्यात आलेल्या ऑल इंडिया सेकंडरी स्कूल एक्झामिनेशन म्हणजेच दहावी बोर्डच्या परीक्षेत अभिनव शिक्षण संस्था संचालित, वसुंधरा अकॅडेमीचा निकाल ९८.५% लागला असून,आदिती इंद्रजित गंभीरे हिने ९४.२% गुण मिळवत प्रथम क्रमांक मिळवला आहे. तर अनुष्का सोमेश्वर धुमाळ हिने ९२.६% गुण मिळवत द्वितीय क्रमांक व अनुष्का सचिन रासकर हिने ९१.८% गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळवला आहे. तसेच आर्यन सुनील कोटकर ९०.६% व हरिकेश अरुण मैड ८९.४% गुण मिळवत अनुक्रमे चौथा व पाचवा क्रमांक मिळवला आहे.

विषयनिहाय इंग्रजी व हिंदी विषयात अदिती गंभीरे ९७ गुण, गणित विषयात अनुष्का धुमाळ ९८ गुण, विज्ञान विषयात कृतिका खैरनार ९२ गुण, समाज अभ्यास विषयात अदिती गंभीरे, पियुष भांगरे, अभिरुची वैद्य ९८ गुण व इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी विषयात हरिकेश मैड ९४ गुण मिळवत विद्यालयात प्रथम आले आहेत.

त्याचप्रमाणे केंदीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (सीबीएसई) वतीने घेण्यात आलेल्या ऑल इंडिया सिनियर स्कूल सर्टिफिकेट एक्झामिनेशन म्हणजेच बारावी बोर्ड परीक्षेत विद्यालयातील विज्ञान शाखेमध्ये कमल भोर याने ८०.८% गुण मिळवत प्रथम क्रमांक मिळवला असून अर्जुन कवडे ७८.४% गुण मिळवत द्वितीय तर समराकिरण अक्कापल्ली ७३.२% गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळवला आहे. अभिषेक आवारी ७२.२% गुण मिळवत चौथा तर अतिक्षा तोरमल व जेसीका वावळे ६७% गुण मिळवत पाचवा क्रमांक मिळवला आहे.

या सर्व यशस्वी व विद्यालयातील सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे अभिनव शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मधुकरराव नवले, उपाध्यक्षा डॉ. जयश्री देशमुख, सहसचिव प्राचार्या अल्फोन्सा डी, कोषाध्यक्ष विक्रम नवले, तसेच व्यवस्थापन मंडळातील सर्व सदस्य, वसुंधरा अकॅडेमीच्या प्राचार्या अपर्णा श्रीवास्तव संस्थेच्या सर्व विभागांचे प्राचार्य व विभागप्रमुख, सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करत विद्यार्थ्यांना त्यांच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# अकोलेतून कोणाला मताधिक्य याचीच चर्चा

## निवडणुकीच्या प्रारंभी तिरंगी वाटणारी निवडणूक अखेर दुरंगीच झाली

**● अकोले । वीरभूमी –**

नुकत्याच झालेल्या शिर्डी लोकसभा मतदार संघाची निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाली असून अकोले तालुक्यातील मतदान हे जवळपास ६० टक्के झाले आहे.



सकाळपासून मतदान केंद्रावर मतदारांनी गर्दी केली होती. मतदानाचा विचार करता महायुतीचे उमेदवार खा. लोखंडे यांच्यासाठी महायुती मधील घटक पक्षांनी आपली वेगवेगळी चूल मांडलेली दिसून आली. अर्थात पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पा. व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिर्डी येथे झालेल्या कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात सर्व पक्षांची एकमेकांशी असलेले हेवेदावे लक्षात घेऊन तशाच सूचना दिल्या होत्या. त्यामुळे खा. लोखंडे यांना निवडून आणण्यासाठी हाच पर्याय योग्य होता, असे वाटले.

दुसरीकडे महाविकास आघाडीच्या सर्व घटक पक्षांनी एकत्र प्रचार केल्याचे दिसले. मात्र काँग्रेसचे ज्येष्ठ नेते माजी महसूल मंत्री आ. बाळासाहेब थोरात यांनी अकोलेतील ज्येष्ठ नेते संजय राऊत यांच्या सभेमध्ये सहभागी झाल्यानंतर ते पुन्हा अकोले तालुक्यात दिसले नाही मात्र अकोले तालुक्यातील काँग्रेसचे ज्येष्ठ नेते मधुकरराव नवले यांच्या नेतृत्वाखाली त्यांचे सर्व मुख्य नेते, कार्यकर्ते, पदाधिकारी, सहकारीयांनी महाविकास आघाडी बरोबर राहून प्रचार केलेला दिसला. तर शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अमित भांगरे यांनी प्रचार सभेतून विरोधकांवर टीका करताना दिसून आले व जि. प. सदस्या सुनीताताई भांगरे यांनी मतदारांच्या भेटीवर भर दिला.

वंचित आघाडीच्या उमेदवार उत्कर्षा रुपवते यांनी सर्व प्रचार यंत्रणासह नियोजन करून एकाएकी लढत दिल्याचे दिसून आले. मतदानाच्या दिवशी भाजप चे जेष्ठ नेते माजी मंत्री मधुकरराव पिचड व माजी आमदार वैभवराव पिचड यांनी आपले सर्व कार्यकर्ते नेते यांना विश्वासात घेऊन प्रचार यंत्रणा उभी करून मतदान घडवून आणण्यासाठी चांगले प्रयत्न केल्याचे दिसून आले. तर राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते, नेते हे त्यांच्या अनुभवानुसार काम करताना दिसत होते. अशी चर्चा ऐकण्यात आली. मनसे, शिवसेना व मारुती मेंगाळ यांनी आपापल्या परीने ताकद लावताना दिसत होते.

तालुक्यातील मुस्लिम समाजाने महायुतीला किती मतदान केले असेल या चर्चेचा विषय होऊ शकतो. सदर समाज महाविकास आघाडीकडे झुकलेला दिसून आला.

उत्कर्षा रुपवते यांच्यासाठी बौद्ध समाज लढतांना दिसत होता. त्यांना इतर समाजाने किती मते दिली असतील हाही एक संशोधनाचा विषय होऊ शकतो. सुरुवातीला तिरंगी वाटणारी लढत मतदानाच्या दिवशी महायुती व महाविकास आघाडी यांच्या मध्येच दुरंगी असल्याचे जाणवत होते. माजी खासदार भाऊसाहेब वाकचौरे व उत्कर्षा रुपवते यांना भूमिपुत्र, भूमीकन्या असल्याचा चांगल्या प्रमाणात उपयोग होईल असे वाटते. असे असलेतरी केंद्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे नेतृत्वाखाली भाजपचे सरकार पुन्हा येणार हा महायुतीचा प्रचार मतदारांना शेवटी विचार करण्यास भाग पाडणारा ठरला आहे.

अकोले तालुक्यातील आदिवासी भागात महायुतीला मताधिक्य मिळेल, असे वाटते. अकोले शहरात संमिश्र वातावरण दिसले.

एक मात्र नक्की की, महायुतीमुळे खा.लोखंडे यांना मोठे मताधिक्य मिळेल असे वाटत होते. मात्र ते मताधिक्य फार मिळणार नाही असे चित्र दिसत आहे. एकंदरीत अकोले तालुक्यात संमिश्र वातावरण वाटत असले तरी खा. लोखंडे काही प्रमाणात का होईना मताधिक्य घेतील असे चित्र आहे.

# काळ्या गव्हाचे उत्पादन घेत शेतकऱ्याचा नवा प्रयोग

## अकोले तालुक्यातील टाकळी येथील शेतकरी प्रसन्ना धोंगडे यांचे यश

**● अकोले । वीरभूमी –**

अकोले तालुक्यातील टाकळी येथे प्रसन्ना धोंगडे या शेतकऱ्याने काळ्या गव्हाचे उत्पन्न घेऊन प्रथमच नवीन प्रयोग केला आहे. राज्याच्या विविध भागातील शेतकरीसातत्याने नवनवीन प्रयोग करत असतात. तसेच पारंपरिक पिकांना बगल देत पीक पद्धतीत बदल करीत असतात.असाच एक प्रयोग अहमदनगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील टाकळी येथील शेतकरी प्रसन्ना धोंगडे यांनी काळ्या गव्हाचे उत्पन्न घेतले आहे.

प्रसन्ना धोंगडे यांच्या आईवडिलांना ब्लड प्रेशर व शुगरचा त्रास होत असल्याने त्यांनी काळा गहू शरीरासाठी उपयुक्त असल्याचे त्यांनी गुगलवर वाचले. व काळ्या गव्हाचा उत्पन्नाचा प्रयोग करण्याचा निर्णय घेतला. काळ्या गव्हाचे बियाणे कोठे मिळतात याचा शोध घेतला. व उत्तरप्रदेश मधील गाझियाबाद येथे राहत असलेल्या आपल्या मित्रामार्फत पंजाब मधून ५ किलो काळ्या गव्हाचे बियाणे ५५० रुपया मध्ये आणले होते. त्यांनी आपल्या शेतात दोन गुंठ्यांत गव्हाची लागवड केली. त्यामध्ये त्यांना काळ्या गव्हाचे ४० ते ४५ किलो उत्पादन मिळाले. सध्या काळ्या गव्हाला किलोमागे ७० रुपये भाव मिळतो. या उत्पन्नांतून १० किलो गहू घरी खाण्यासाठी ठेवणार असून बाकी गव्हाचे बियाणे म्हणून वापरून शेतीमधून मोठे उत्पन्न घेण्याचा त्यांनी निर्णय घेतला आहे.

काळ्या गव्हामध्ये सामान्य गव्हापेक्षा ६० टक्के जास्त लोह असते. गव्हाचा काळा रंग त्यामध्ये असलेल्या अँथोसायनिन नावाच्या रंगद्रव्यामुळे होतो. या जातीमध्ये अँटिऑक्सिडंट घटक आढळतात जे आरोग्यासाठी फायदेशीर असतात. याची चव सर्व सामान्य गव्हासारखीच असते. काळ्या गव्हाची लागवड प्रामुख्याने मध्य प्रदेश, राजस्थान, हरियाणा, पंजाब, उत्तर प्रदेश या राज्यांमध्ये केली जाते.

एका किलोग्रॅम काळ्या गव्हाची किंमत ७० रुपये आहे, जी सामान्य गव्हाच्या तुलनेत चारपट जास्त आहे. तथापि, काळ्या गव्हाचे पौष्टिक फायदे लक्षात घेता ते अजूनही कमी किंमतीत उपलब्ध आहे आणि भविष्यात ते अधिक महाग मिळण्याची शक्यता आहे. काळ्या गव्हाचे पीठ १२५ ते १३० रुपयांना मिळते.

नॅशनल ॲग्री फूड बायोटेक्नॉलॉजी इन्स्टिट्यूट मोहाली येथील शास्त्रज्ञ मोनिका गर्ग यांनी सात वर्षांच्या संशोधनानंतर काळा गहू शोधला. भारतीय कृषी संशोधन परिषदेने याला मारू गहू असे नाव दिले, तर राष्ट्रीय कृषी आणि अन्न जैवतंत्रज्ञान संस्थेने नबी एम.जी. नाव दिले.

काळ्या गव्हामध्ये प्रथिनांचे प्रमाण, आहारातील फायबर, कॅल्शियम, व्हिटॅमिन के, फ्लेव्होनॉइड (टीएफसी) आणि फिनोलिक सामग्री (टीपीसी) अँटिऑक्सिडंट क्रिया पारंपरिक पिवळ्या गव्हापेक्षा जास्त असते. संशोधन असे सूचित करते की काळा गहू हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी रोग, जळजळ, कर्करोग, मधुमेह आणि लठ्ठपणापासून संरक्षण करतो. काळ्या गव्हातील फायबर घटक कर्करोग, लठ्ठपणा आणि मधुमेहाच्या रुग्णांसाठी फायदेशीर ठरतात.

काळ्या गव्हात अँथोसायनिन असते, जे एक अँटिऑक्सिडेंट आहे जे रोगप्रतिकारक शक्ती वाढवते. ब्लूबेरी आणि जांभूळ या फळांमध्ये अँथोसायनिनचे प्रमाणही जास्त असते. परंतू ही फळे वर्षभर उपलब्ध नसल्यामुळे, काळा गहू आपल्या दैनंदिन आहारात या पोषक तत्वांचा सहज स्रोत प्रदान करतो.



काळा गहू ही कृषी क्षेत्रात नवी क्रांती ठरू शकते. याचे असंख्य पौष्टिक फायदे आहेत आणि ते सामान्य गव्हासारखे पीक घेतले जाऊ शकतात. काळा गहू शेतकऱ्यांसाठी फायदेशीर पीक ठरू शकतो आणि ग्राहकांच्या आरोग्यासाठी फायदेशीर ठरु शकतो.

# नेत्रदान व अवयवदानच्या जनजागृतीने छत्रपती संभाजी महाराजांना अभिवादन

**● नगर । वीरभूमी –**

– छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या वतीने नेत्रदान व अवयवदानची जनजागृती करण्यात आली. पुणे येथे मोतीबिंदू शस्त्रक्रिया होऊन शहरात परतलेल्या ज्येष्ठ नागरिकांना फिनिक्सचे संस्थापक अध्यक्ष जालिंदर बोरुडे यांनी संकल्प अर्जाचे वाटप करुन नेत्रदान व अवयवदानचे आवाहन केले.

प्रारंभी जुने बस स्थानक येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास अभिवादन करुन छत्रपती संभाजी महाराजांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. मोफत नेत्र तपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबिरातील गरजूंवर के.के. आय बुधराणी येथे शस्त्रक्रिया करण्यात आली. नुकतेच शस्त्रक्रिया झालेले नागरिक शहरात परतले असताना त्यांच्या उपस्थितीमध्ये हा उपक्रम राबविण्यात आला.

जालिंदर बोरुडे म्हणाले की, संभाजी महाराजांनी स्वराज्याच्या रक्षणासाठी आपले रक्त सांडले. या युगपुरुषाला आगळ्यावेगळ्य पध्दतीने अभिवादन करण्यासाठी नेत्रदान व अवयवदानाची जागृती करण्यात आली.

महापुरुषांनी समाजातील उपेक्षित घटकांच्या कल्याणासाठी जीवन वेचले. त्यांचा आदर्श समोर ठेऊन नेत्रदान संकल्प फॉर्म भरून नव्हे, तर प्रत्यक्ष मृत्यूनंतर जवळच्या नेत्रदान व अवयवदान केल्यास खऱ्या अर्थाने महापुरुषांना अभिवादन ठरणार आहे. समाजात नेत्रदान व अवयवदानाची जागृती होण्याची गरज असल्याचे सांगितले.

निसर्गाने दिलेली अनमोल ठेव म्हणजे डोळा असून, डोळ्याने जीवनाचा खरा आनंद घेता येतो. रोज मरणाऱ्या एका व्यक्तीचे डोळे दान केल्यास जवळपास सर्वच अंध व्यक्तींना दृष्टी प्राप्त होणार आहे. त्याचप्रमाणे अवयवदानाद्वारे अनेक गरजूंना नवजीवन जगता येणार असल्याचे फिनिक्सच्या वतीने स्पष्ट करण्यात आले. बोरुडे यांनी यावेळी नेत्रदान व अवयवदानाचे संकल्प अर्ज भरुन घेतले.